# महाराष्ट्र शासन
# वेतन पथक (उच्च शिक्षण)
# पुणे विभाग, पुणे

१७, डॉ.आंबेडकर रोड, पुणे विभाग, पुणे-०१

Web:www.jdhepune.info

E_mail ID- admin@jdhepune.info

फोन नं.०२०-२६१२७८३३

फॅक्स नं. ०२०-२६०५१६३२

क्र.वेतन-२०२०/२०२०-२१/०८/वेतन पथक, पुणे 19369 दि.१२-०५-२०२२

प्रति,

प्राचार्य,

सर्व अशासकीय अनुदानित कला, वाणिज्य, विज्ञान, विधी,

शिक्षणशास्त्र आणि शारीरिक शिक्षणशास्त्र महाविद्यालये,

पुणे / अहमदनगर / नाशिक.

विषय:- राज्यातील अकृषि विद्यापीठे व अशासकीय अनुदानित महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे वेतन विहीत वेळेत करण्याबाबत...

संदर्भ:- १) मा.संचालनालयाकडील क्र.अर्थसं-२०२०/संकीर्ण/वेतन अदा/लेखा-२/७६५३, दि.१७-११-२०२०.

२) या कार्यालयाकडील समपत्र दि.१८-११-२०२०.

३) अध्यक्ष, डॉ.बाबासाहेब आंबेडकर शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी संघटना, पुणे यांचे दि.२५-०४-२०२२ रोजीचे निवेदन.

उपरोक्त विषयाचे संदर्भात नमूद केलेल्या संदर्भ क्र.१ व २ येथील पत्रांचे अवलोकन व्हावे.

या विभागाच्या अधिनस्त असलेल्या अशासकीय अनुदानित महाविद्यालयातील शिक्षक / शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे वेतन प्रस्तूत कार्यालयाकडून विहीत वेळेत महाविद्यालयाच्या वेतन बँक खात्यावर जमा करुनदेखील संबंधित महाविद्यालयांकडून कर्मचाऱ्यांना वेळेत वेतन अदा होत नसल्याबाबतच्या तक्रारी लोक प्रतिनिधी व संघटनांकडून प्राप्त होत आहेत. तसेच या संदर्भात संदर्भ क्र.३ अन्वये पुन:श्च तक्रार प्राप्त झालेली आहे.

या संदर्भात आपणास प्रस्तूत कार्यालयाकडून कर्मचाऱ्यांचे वेतन अनुदान संबंधीत महाविद्यालयाच्या खात्यावर जमा झाल्यानंतर ते तात्काळ संबंध ीत कर्मचाऱ्यांच्या खात्यावर जमा करणेबाबत वेळोवेळी निर्देशित केलेले आहे.

आपणांस याबाबत पुन:श्च निर्देशित करण्यात येते की, प्रस्तूत कार्यालयाकडून कर्मचाऱ्यांचे वेतन अनुदान संबंधीत महाविद्यालयाच्या खात्यावर जमा झाल्यानंतर ते तात्काळ संबंधीत कर्मचाऱ्यांच्या खात्यावर जमा करण्यात यावे.

अन्यथा संबंधीत कर्मचाऱ्यांना वेतन अदायगीस होणाऱ्या विलंबास संबंधीत महाविद्यालयाचे प्राचार्य जबाबदार राहतील, याची गांभीर्याने नोंद घ्यावी.

(डॉ.किरणकुमार बोंदर)
सह संचालक (उच्च शिक्षण)
पुणे विभाग, पुणे-१.

प्रत:- १.मा.शिक्षण संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे-४११ ००१ यांना माहितीसाठी सविनय सादर.

२.अध्यक्ष, डॉ.बाबासाहेब आंबेडकर शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी संघटना, पुणे